**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी आणखी तेराशे कोटींच्या मदतीचा शासन निर्णय जारी

- यंदाच्या रब्बी हंगामात पेरणी क्षेत्रात ८ लाख हेक्टर वाढ होण्याची शक्यता, हंगामाचं सक्षम आणि समन्वित नियोजन करण्याच्या कृषी मंत्र्यांच्या सूचना

- नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत लोकार्पण

**आणि**

- राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांचं निधन

**<><><><><>**

गेल्या महिन्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी एक हजार ३५६ कोटी रुपयांची मदत मंजूर झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली आहे. सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड या जिल्हांमधल्या २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१ हेक्टरहून अधिक बाधित पिकांसाठी ही मदत मिळेल. यासाठीचा शासन निर्णय झाल्याचं त्यांनी पत्रकाद्वारे म्हटलं आहे.

या आपत्तीत मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना, ज्यांच्या पशुधनाचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना जिल्हास्तरावरुन मदत दिली जाणार आहे. यामुळे त्या प्रकारातल्या मदतीचं वितरण ताबडतोब होईल, असंही मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

अतिवृष्टीची झळ बसलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारनं केलेली मदत तुटपुंजी असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळं हवालदिल झालेल्या शेतकरी वर्गाबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यासाठी त्यांच्या पक्षानं आज दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे, असं त्यांनी बारामती इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारनं भरघोस पॅकेजची घोषणा केली होती, पण दिवाळीच्या तोंडावर फक्त अठराशे कोटींपर्यंतच्या मदतीचेच जीआर आले आहेत. राज्यसरकार हेक्टरी फक्त १० हजार रुपयांची मदत देत आहे, अशी टीका काँग्रेसचे विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

अतिवृष्टी आणि पूरामुळे नुकसान झालेल्या राज्यातल्या शेतकर्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी आणि हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई त्वरीत द्यावी, अशी मागणी करत राष्ट्रवादी शरद पवार पक्षानं आज धुळ्यात निदर्शनं केली.

**<><><><><>**

केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी मदतनिधी जमा करण्यासाठी महसूल विभाग सुट्टीतही काम करणार असल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात सांगितलं. सध्याच्या परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी राजकारण विसरून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहणं, शेतकऱ्यांसाठी काम करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

मराठा आरक्षणाबाबत २ सप्टेंबरचा आदेश हा केवळ हैदराबाद गॅझेट आणि चार जिल्ह्यांपुरता आहे, खोटं प्रमाणपत्र दिलं जाणार नाही, याबाबत महसूल विभाग पूर्णपणे दक्ष आहे, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

यंदाच्या हंगामात रब्बी पीकांचं क्षेत्र ५७ वरुन ६५ लाख हेक्टरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळं रब्बी हंगामाचं नियोजन अधिक सक्षम आणि

समन्वित पद्धतीनं करण्याच्या सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या आहेत. पुण्यात आज झालेल्या रबी हंगामाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळं खरीपाच्या पीकांचं नुकसान झालंय. परिणामी रबी हंगाम महत्त्वाचा आहे. धरणं, विहिरी तुडुंब भरल्याने शेतकऱ्यांना या वर्षी पाण्याची फारशी टंचाई भासणार नसल्यानं रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात पेरण्या होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

रब्बी हंगामात सव्वा ११ लाख क्विंटल बियाण्याची गरज आहे. अशावेळी साडे १४ लाख क्विंटलपेक्षा अधिक बियाणं शिल्लक असल्याबद्दल कृषीमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं. यंदाच्या रब्बी हंगामासाठी सव्वा ३१ लाख मेट्रीक टनांहून अधिक खत वाटपाला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. त्यातुलनेत १६ लाख मेट्रीक टनांहून अधिक खत उपलब्ध आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार झाला. त्यात २१ मंत्र्यांनी शपथ घेतली. माजी गृहराज्यमंत्री हर्ष सिंघवी यांनी आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गांधीनगरमध्ये आयोजित कार्यक्रमात नवीन मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

(आधीच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री असलेले प्रफुल्ल पानसेरिया यांना कॅबिनेट मंत्री पदी बढती मिळाली. क्रिकेटपटू रविंद्र जडेजा याची पत्नी रिवा बा यांनीही राज्यमंत्री पदाची शपथ घेतली. एकूण ५ कॅबिनेट मंत्री, ३ स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री आणि १२ राज्यमंत्र्यांचा आज शपथविधी झाला. यावेळी मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित होते. या शपथविधीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण मंत्रिमंडळानं काल राजीनामा दिला होता.)

**<><><><><>**

पुण्यातल्या मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला गती देण्यासाठी पुणे महानगरपालिकेला ११ हजार १५ चौरस मीटर शासकीय जमीन कब्जेहक्काने द्यायला महसूल आणि वन विभागाने मंजुरी दिली आहे. या जमिनीचा वापर मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत नदीच्या सुधारणा, पर्यावरणीय संतुलन आणि सौंदर्यीकरणासाठी होणार आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. या विमानानं यावेळी आकाशात उड्डाण केलं. ओझरमधल्या हिंदुस्थान एअरोनॉटिक्सच्या कारखान्यात हा कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी तेजस एमके वन ए या लढाऊ विमानाच्या उत्पादन साखळीचंही लोकार्पण केलं. भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

**होल्ड - राजनाथ सिंग बाइट**

नाशिकमध्ये तयार झालेल्या सुखोई-३०, एलसीए आणि एचटीटी-४० विमानांच्या उड्डाणांचं राजनाथ सिंह यांनी कौतुक केलं. हे उड्डाण देशाच्या स्वावलंबनाचं उड्डाण असल्याचं ते यावेळी म्हणाले. २०१४ पूर्वी जवळपास ६५ ते ७० टक्के संरक्षण सामग्री आयात केली जात होती. मात्र आता जवळपास ६५ टक्के उत्पादनं देशात तयार होत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आज अल्पशा आजाराने निधन झालं. ते ६५ वर्षांचे होते. १९९५ मध्ये युती सरकारच्या काळात त्यांनी राज्यमंत्री म्हणूनही काम पाहिलं होतं. नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते विद्यमान अध्यक्ष होते. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या कर्डिले यांनी तरुण वयातच नेतृत्व गुण सिद्ध करून अपक्ष उमेदवारी करीत नगर

तालुक्यातून आमदारकी मिळवली होती. नंतर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप असा प्रवास करीत ते पाच वेळा विधानसभेवर निवडून गेले होते.

शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ४८५ अंकांची वाढ झाली आणि तो ८३ हजार ९५२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १२५ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ७१० अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

हवाई दलातल्या सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांनी दर्जा, व्यावसायिकता, सुरक्षा आणि कार्यक्षमता यासाठी कायम वचनबद्ध रहावं. त्यातूनच देशाच्या हवाई रक्षणासाठी भारतीय हवाई दल प्रभावीरित्या कार्यरत राहू शकेल, असं हवाई दल प्रमुख ए. पी. सिंग यांनी आज सांगितलं.

**<><><><><>**

डिजिटल अटकेच्या नावाखाली मुंबईतल्या एका व्यावसायिकाचे ५८ कोटी रुपये लंपास करणाऱ्या ३ आरोपींना सायबर पोलीसांनी अटक केली आहे. फसवणुकीच्या या प्रकारादरम्यान आरोपींनी संबंधित व्यावसायिकासह त्याच्या पत्नीला व्हिडीओ कॉलवरून धमकी दिली होती. धमकीच्या धाकामुळं या दाम्पत्यानं १९ ऑगस्ट ते ८ ऑक्टोबर दरम्यान आरोपींनी मागणी केलेले ५८ कोटी रुपये त्यांच्या खात्यात वर्ग केले होते.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. विदर्भात काही ठिकाणी किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात हवामान कोरडं राहिल.

दरम्यान, दक्षिण भारतातल्या समुद्री किनाऱ्यावर वादळी वारे, उंच लाटा येण्याची शक्यता असल्यानं पुढील आदेशापर्यंत समुद्रात न जाण्याचा इशारा हवामान विभागानं मच्छिमारांना दिला आहे.

**//<><><><><>//**